नि.फौ.के. नं. ६०/२०२४
महाराष्ट्र शासन वि. विघ्नेश भेरे व इतर
निशाण क्र. ५५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव –** सुरेखा सुरेश गुरव,

**वय –** ६० वर्षे, **व्यवसाय** – गृहिणी,

**राहणार –** बोंडये, भेरेवाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक १३/०५/२०२४ रोजी मी माझ्या घरी हजर होते. त्यादिवशी काय झाले होते, हे मला माहिती नाही. कारण मी त्यावेळी रात्री १०:०० च्या सुमारास घरात झोपले होते.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/०५/२०२४ रोजी आमच्या वाडीमध्ये श्री. सत्यनारायणाची सार्वजनीक पुजा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर पुजेच्या खर्चाबाबत दिनांक १३/०५/२०२४ रोजी रात्री १०:३० च्या दरम्यान यशवंत गुडेकर यांच्या अंगणात मिटींग जमली होती व त्यामध्ये वाडीतील २५ ते ३० लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिटींगला माझा पुतण्या – कल्पेश हा उपाध्यक्ष असुनही आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कल्पेशला मिटींगमध्ये बोलाविण्यासाठी तेथील लोक सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिटींगमध्ये विघ्नेश भेरे व अविनाश गुरव हे दोघे गेले होते.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी विघ्नेश भेरे हा माझा मुलगा – अविनाश गुरव याला *''किती दम आहे, ते बघुन घेतो''* असे सारखे सारखे म्हणत होता. हे म्हणणे

खरे आहे की, त्यामुळे सिध्देश याला कल्पेश गुरव व त्याचे वडील दत्ताराम गुरव यांना बोलाविण्यास सांगितले होते. हे मला माहिती नाही की, त्यावेळी *''कोणात किती दम आहे, ते बघु''*, असे सिध्देश गुरव असे म्हणाला होता. हे मला माहिती नाही की, त्याचा विघ्नेश भेरे याला राग येवुन रात्री १२:३० च्या दरम्यान त्याने मिटींगमध्ये अंगणाच्या कट्ट्यावर माझा मुलगा – अविनाश बसला असताना त्याच्या छातीवर व तोंडावर लाथ मारुन त्याला खाली मळीत पाडले होते. हे म्हणणे खरे आहे की, विघ्नेश, गणेश व आदीत्य हे सख्खे भाऊ आहेत.

०४. हे मला माहिती नाही की, विघ्नेश, गणेश, आदीत्य व दिपक यांनी माझा मुलगा – अविनाश याला ढकला–बुकल करुन खाली पाडुन हाताच्या थापटाने व लाथाबुक्क्यांनी छातीवर, पाठीत व पोटात व तोंडावर मारहान केली होती. हे मला माहिती नाही की, त्यावेळी बळीराम भेरे हे देखील तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी सोडविण्यासाठी मध्ये गेले असताना बळीराम भेरे याने माझ्या गालावर चापट मारली होती. हे मला माहिती नाही की, त्यावेळी बळीराम भेरे यांनी अविनाश याला *''तु भेटशील, तेथे तुला ठार मारीन''* अशी जीवे मारण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या झटापटीत अविनाश याचा बरर्मुडा फाटला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी व अविनाश गुरव यांनी साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात जावुन उपचार घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, अविनाश याने विघ्नेश, गणेश, आदीत्य, दिपक व बळीराम यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

०५. *(साक्षीदारास तिच्या तपासटिपणातील चिन्हांकित अ कडील मजकुर वाचुन दाखविण्यात आला).* तो मजकुर बरोबर नाही. सदरचा मजकुर तसा माझ्या तपासटिपणात का नमुद करण्यात आला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझ्याकडे घरी येवुन चौकशी केली होती. त्यामध्ये त्यांना मी केवळ भांडण झाल्याचे व सदर मिटींगमध्ये गेले नसल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड होवुन आरोपींसोबतचा वाद आता मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झाल्यामुळे आरोपींना वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. आरोपी यांना दाखविल्यास ओळखु शकते. आज रोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडुन</u> –**

०६. हे म्हणणे खरे नाही की, अविनाश याने विघ्नेश, गणेश, आदीत्य, दिपक व बळीराम यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे मी सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १३/०५/२०२४ रोजी मी नेहमी प्रमाणे रात्री १०:०० च्या सुमारास माझ्या घरी झोपले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्या वाडीत त्यावेळी असलेल्या मिटींगमध्ये नेमके काय घडले, याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिटींगमध्ये भांडणे झाल्याचे मी सरतपासात खोटे कथन केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.06 17:51:00 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०६.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 06/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 06/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 06/02/2026 |